# पुष्प दुसरें

अध्यक्ष — एस्. एम्. जोशी

वक्ते — ना. ग. गोरे

**९ मे १९४९**

काल डॉ. घनंजयराव गाडगिळांनी आपल्या व्याख्यानाच्या प्रारंभींच सांगितलें कीं आपण या विषयाची फक्त पार्श्वभूमि श्रोत्यासमोर मांडणार आहोंत; प्रत्यक्ष कार्यक्रम व मार्ग याबद्दलचें विवेचन उद्यापासून जे राजकीय पुढारी बोलणार आहेत ते करतील. म्हणजे त्यांनीं आपल्या स्वाभाविक व विद्वत्ताजन्य शालीनतेमुळें जी जबाबदारी नाकारली तिच्या मी अशा प्रकारें अगदीं तोंडाशींच सापडलों आहे! समाजवादी पक्षाचा मी एक कार्यकर्ता असल्यामुळें मी राजकीय पुढारी नाहीं असें म्हणण्याचीही आतां सोय राहिलेली नाही! असो. मी माझ्यावरील ही जबाबदारी टाळूं इच्छित नाही. मात्र आपण एवढेंच लक्षांत ठेवावें कीं मी आज जो मार्ग सुचवीन तो निर्णायक स्वरूपाचा नसून सूचनात्मक आहे. सगळ्यांना तो पटला तरच त्या प्रमाणें त्याची अमल बजावणी होईल. न पटला तर त्यांत भर पडेल किंवा काटछाटही होईल.

## थोडीशी पार्श्वभूमि

भाषावार प्रांत रचनेबद्दलचे उल्लेख कॉंग्रेसच्या १९२० पासूनच्या ठरावांत मिळत असले तरी तेवढ्या आधारावर आपणांस फारसें विसंबून राहतां येणार नाहीं. कारण कॉंग्रेसनें देखील मराठी भाषिकांचा एक प्रांत केल्याचा दाखला नाही. वऱ्हाड, मुंबई व महाराष्ट्र अशा तीन स्वतंत्र कॉंग्रेस कमिट्या होत्या व

अजूनही आहेत. तथापि या तत्वाला मान्यता असल्याचा स्पष्ट उल्लेख नेहरू रिपोर्टांत ( १९२८ ) मात्र निर्विवादपणें मिळतो. तुम्ही आपली राज्यघटना बनवून दाखवा अंगात धमक असेल तर, या तत्कालीन भारत चिटणीस लार्ड बर्कनहेड यांच्या आव्हानाला उत्तर म्हणून नेहरू रिपोर्ट तयार झाला साहजिकच हिंदुस्थानांतील प्रांताच्या फेररचनेचा मुद्दा त्यांना विचारांत घ्यावा लागला. प्रांताची फेररचना करावयाची तर ती कोणत्या पायावर करावी ? पायाभूत असें कांहीं ऐतिहासिक, भौगोलिक, भाषिक तत्व उपलब्ध होतें का? हें प्रश्न उपस्थित झाल्याबरोबर लगेच त्याचें उत्तरही मिळालें. आणि तें भाषावार प्रांतरचनेला अनुकूल असेंच मिळालें. कारण त्याशिवाय अन्य उत्तर सुचणें शक्य नव्हतें.

असें दिसून आलें कीं, दक्षिण भारतांत बहुभाषी प्रांतांची नुसती खिचडी झाली आहे. मुंग्यांचें वारूळ जसें वाटेल त्या आकाराचें तयार होतें तशीं प्रांतांचीं वारूळें तयार झालेलीं आहेत. सिंधी, गुजराथी, मराठी व कानडी भाषी लोक मुंबईत कोंबले आहेत; तर तेलगू, तामीळ, मल्याळम् व कानडी बोलणारे लोक मद्रासमध्यें एकत्र बसले आहेत. आणि त्यामुळें अविश्वासाचें, मत्सराचें व संशयाचें वातावरण निर्माण होत आहे. ही परिस्थिति दूर करण्याचा एकच मार्ग सुचण्या सारखा होता. आणि तो म्हणजे भाषावार प्रांत रचना.

### भाषावार प्रांतरचनेची निकड कां भासली ?

१९३५ च्या कायद्यानंतर प्रांतिक सरकारांना जवळ जवळ प्रांतिक स्वायत्तता मिळणार हें ठरलें. १९३७ पासून स्वायत्त प्रांतिक सरकारें अस्तित्वांतही आलीं आणि तेव्हांपासून भाषावार प्रांत रचनेच्या मागणीला विशेषच अर्थ प्राप्त होऊं लागला. तेलगू व कानडी भाषिकांकडून भाषावार प्रांत रचनेची मागणी विशेष आग्रहानें होऊं लागली. तेलगू भाषिकांपाशीं एवढी जनसंख्या, प्रदेश, किनारा व निसर्गसंपत्ति असतां त्यांना तामिळभाषिकांच्या ओंजळीनें पाणी प्यावें लागत होतें हा अन्यायच होता.

कानडिकांची दुर्दशा तर विचारूच नका. त्यांच्या प्रांतांची छकलें एक मद्रासेंत तर एक मुंबईत असला प्रकार झालेला आणि दोन्हीकडे त्यांचें अत्यल्प मत ! त्यामुळें त्यांची स्थिति श्रीमंताकडच्या वारकऱ्यासारखी होत होती. जोपर्यंत सरकार प्रातिनिधिक नव्हतें तोंपर्यंत भाषावार प्रांतरचनेला कांहीं विशेष अर्थ नव्हता. पण आपलें मनोगत व आपलीं सुखदु:खें समजणारे आपले विश्वासाचे प्रतिनिधि राज्यकारभार करणार व करूं लागले असें दिसल्यावर आपली दुर्दशा संपावी आणि आपण आपल्या घराचा कारभार मनपसंत करूं लागावें अशी इच्छा होणें साहाजिकच नव्हे काय ?

१९३७ चीं कॉंग्रेस मंत्रिमंडळें सारीं दोनच वर्षे टिकलीं. तीं अधिक टिकतीं तर हा प्रश्न त्याच वेळीं निकरावर येतां याबद्दल मला संशय नाहीं. पण १९३९ सालीं तीं राजीनामे देऊन बाहेर पडलीं आणि पुढें तब्बल सात वर्षे देशांत लढ्याचें वातावरण टिकून राहिलें. त्यामुळें हा प्रांत रचनेचा प्रश्न बाजूस पडला.

१९४७ सालीं सत्ता संक्रमण झालें आणि हिंदुस्थानच्या हातीं अधिकारसूत्रें आलीं. संस्थानेही एकामागून एक विलीन होऊं लागली, त्यामुळें लोकराज्यांतले अडथळे दूर होत चालले व जनतेला पुन्हां हुरूप आला. हिंदी संघराज्याचा नकाशा तुम्ही कोणत्या तत्वावर बनवणार ? या प्रश्नाला सामान्य माणसानें सुद्धां अगदीं सहजस्फूर्त उत्तर दिलें कीं " भाषावार प्रांतरचनेच्या तत्वानुसार ! " यांत परप्रांतीयांचा द्वेष नव्हता, असहिष्णु वृत्ती नव्हती, किंवा परप्रांतीयावर कुरघोडी करण्याचाही डाव नव्हता.

## संयुक्त महाराष्ट्राची मागणी

महाराष्ट्रानें संयुक्त महाराष्ट्राची मागणी केली ती अगदी अलिकडे, म्हणजे प्रांत पुनर्रचनेच्या प्रश्नाला व्यावहारिक महत्व प्राप्त झाल्यानंतर, १९४८ च्या आक्टोबरांत मुंबईला संयुक्त महाराष्ट्र परिषदेचें जें विशाल अधिवेशन भरलें तेव्हां महाराष्ट्रांत या मागणीच्या मागे केवढा जनसमुदाय उभा आहे त्याचें प्रत्यक्ष दर्शन घडून आलें.

## धार समितिचा पक्षपात

या नंतर धार समितीची योजना झाली. धार समितीचें कामकाज निःपक्ष-पाती चौकशी समिति प्रमाणें चाललें आहे असें मला तिच्या समोर साक्ष देतांना सुद्धां वाटलें नाहीं. समितीचा पक्ष अगोदरच ठरून गेल्यासारखा दिसत होता. त्याच सुमारास पंडितजी व सरदार यांनी जाहिर सभांतून भाषणें करून आपलें मनोगतही बोलून दाखवलें होतें. एकादा विषय न्यायप्रविष्ट झाल्यावर बोलूं नये असा संकेत असतो पण आमचे नेते या बंधनापलीकडे गेलेले आहेत! राज्यकर्त्यांचें मनोगत कळल्यानंतर त्यापासून योग्य तें अनुमान काढणें श्री. धारासारख्या मुख्यी अधिकाऱ्याला फारसें जड गेलें नाहीं! आपल्याकडून कोणत्या निर्णयाची अपेक्षा आहे तें त्यांना समजलेंच असलें पाहिजे!

धार कमिशनच्या अहवालांत महाराष्ट्रांतील पुणेरी विचार सरणीबद्दल जो शेरा मारलेला आहे तो अनाठायी आहे असें आपणांस कदाचित् वाटेल. पण राज्यकर्त्यांच्या ठिकाणीं महाराष्ट्राबद्दल जी सार्वत्रिक आढी बसलेली आहे, त्याचाच तो निदर्शक आहे. गांधीवधाच्या खटल्यावरच्या निकाल पत्रांत न्यायाधिशांनीं ब्राह्मण विरुद्ध ब्राम्हणेतर, महाराष्ट्रीय विरुद्ध महाराष्ट्रेतर असे ध्वनि काढण्यासहि कमी केलेले नाहीं यावरून काय तें समजा. महाराष्ट्र द्वेषाची इंजेक्शनें हल्लीं सर्वच उच्च पदस्थ अधिकाऱ्यांना देण्यांत येतात कीं काय नकळे!

अपेक्षेप्रमाणेंच धारसमितीचा निर्णय विरुद्ध बाजूनें लागला. त्यावर खूपच वादळ माजलें. आंध्रापासून महाराष्ट्रापर्यंत सर्वांनीं समितीच्या निर्णयाचा निषेध केला. मुंबई असेंब्लींतील महाराष्ट्रीय आमदारांनींहि संयुक्त महाराष्ट्राच्या माग-णीच्या बाजूनें आवाज उठवला, हें जगांतलें आठवें आश्चर्यच होय! श्री. काकासाहेबांच्या नाट्यपूर्ण भाषेंत बोलावयाचें तर 'मुंडी निचे हात उपर' अशी कवायत सदैव करणाऱ्यांनीं एवढें धैर्य दाखवलें हेंच विशेष म्हटलें पाहिजे! आमचे महाराष्ट्रीय मंत्री—पंतप्रधान खेर, पाटील तपासे हे मात्र तटस्थ

राहिले ! परवांच्या पोटनिवडणुकींत मात्र हे तटस्थ राहिले नाहींत. तेथें त्यांची पक्षातीत भुमिका कोठे गेली कोण जाणे ! पण भाषावार प्रांत रचनेच्या बाबतींत गप्प राहाण्याबद्दलही त्यांचें एकमत नाहींच. श्री. एम्. पी. पाटिल यांनीं संयुक्त कर्नाटकाचा जोरदार पुरस्कार चालवलेला आपण वाचला असेलच. असो. या वादळामुळें जयपूर काँ. अधिवेशनानें पट्टाभि समिति नेमून तिच्याकडे या बाबतचा निर्णय देण्याचें काम सोपवलें.

## स्वतंत्र मुंबईचें समर्थन हास्यास्पद

संयुक्त महाराष्ट्राला कॉंग्रेस श्रेष्ठींची संमति मिळाली असती. पण येथें 'भार्या रूपवती शत्रुः' अशासारखा थोडासा प्रकार झालेला आहे. मुंबई आम्ही आमची म्हणतों त्यामुळें हें सारें घोडें अडलेलें आहे. मुंबई महाराष्ट्रांत जाऊं नये म्हणून दार समितीने व पट्टाभि समितीने ज्या हिकमती लढवल्या आहेत व जे तात्विक अवडंबर माजवलें आहे तें पाहिलें कीं मति कुंठित होते. मुंबई म्हणे बेट आहे. म्हणून तें महाराष्ट्रांत जाण्याचें कारण नाहीं ! जंजिरा हें देखील बेट आहे व त्यावरची वस्ति मुसलमानांची आहे. म्हणून कां तें पाकिस्तानांत घालणार ? एक भौगोलिक कसोटी तरी लावा नाही तर ऐतिहासिक तरी लावा. कधीं हा तर कधीं तो असें करून कसें चालेल ?

मुंबईचा व्यापार महाराष्ट्रियेतरांनीं वाढवला म्हणतां तर कलकत्त्याचा व जमशेटपुरचा काय बंगाल्यांनीं व बिहाऱ्यांनीं वाढवला काय ? कलकत्त्याला तर कामगार देखील बिगर बंगाली आहेत हें डॉ. अंबेडकरांनीं दाखवलें नाहीं काय ? जर मुंबईच्या बाबतींत एक न्याय तर या शहरांच्या बाबतींत दुसरा असें काय म्हणून ?

मुंबई महाराष्ट्रांत जाणार या धडकीनें मुंबईचा व्यापार बसत चालला असें पट्टाभि समितीचा अहवाल म्हणतो ! या समितीवर नेहरू असतांना असें विधान त्यांत यावें हें आश्चर्य आहे ! मांडवलवाल्यांनीं संप केलेला आहे असें नेहरूच म्हणत असतात. त्यांना भांडवलवाल्यांची वृत्ति ठाऊक नाहीं काय ? ज्यांनी जनतेला हातोहात १०० कोटी रुपयांना नागवलें, सरकारचा उतला

कर बुडवला, पाकिस्तानांत, हैदराबादेंत व आफ्रिकेंत माल पाठवण्यास ज्यांनी मागे पुढें पाहिलें नाहीं ते वाटेल त्या सबबीवर घबराट उत्पन्न करण्यास कमी करतील कीं काय? मुंबई महाराष्ट्रांत गेली कीं ती लुटण्यासाठीं जणूं कांहीं रायगडावरून शिवाजी महाराजच पुन्हां खालीं उतरणार आहेत! हा कांगावा भाषावार प्रांतरचनेच्या विरुद्ध पुरावा म्हणून पुढें करण्यांत यावा या परती आमच्या नेत्यांच्या मनोदौर्बल्याची साक्ष ती कोणती?

## महाराष्ट्र विरोधी कारवाया हाणून पाडा

गंमत कशी आहे पहा. मुंबई तर देत नाहींतच पण बृहन्मुंबईसाठीं महाराष्ट्राची आणखी भूमि घेण्यांत यावी असा आदेश मात्र हा अहवाल निःशंकपणें देत आहे! या वर्षीच्या मुंबईच्या अंदाजपत्रकांत तशी तरतूद केलेली नव्हती. पण आतां वरून आदेश आल्यावर पुन्हां मुंबई सरकार ही योजना हातीं घेण्याचा संभव आहे. महाराष्ट्राच्या जखमेवर यामुळें मीठ चोळल्यासारखें होत आहे. आम्हाला स्वतंत्र राहावयाचें नाहीं असें मुंबई-करांनींच आतां सरकारला सांगितलें पाहिजे.

परंतु सरकारनें व काँग्रेसनें ही भूमिका घेतली आहे खरी. याचा प्रतिकार कसा करावयाचा हा प्रश्न आहे. धार कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाल्याबरोबर मी श्री. हिरे यांची भेट घेऊन प्रचाराचा एक सर्व पक्षीय मोर्चा उभा करण्याची विनंति केली होती. पण माझी सूचना त्यांना फारशी पटली नसावी किंवा त्रिमूर्ति समितीच्या अहवालाबद्दल ते अधिक आशावादी असावेत. तें कसेंहि असो. आतां त्रिमूर्तींचा निकाल स्पष्टपणें आपल्या विरुद्ध लागलेला आहे तेव्हां पुन्हां एकवार आपणास कांहीं तरी केलेंच पाहिजे. मध्यंतरी काँग्रेसश्रेष्ठींच्या सद्बुद्धीवर विसंबून आपण आपल्या प्रचारांत जी शिथिलता येऊं दिली होती ती आपण दूर केली पाहिजे.

कारण त्रिमूर्तींनी संयुक्त महाराष्ट्राच्या योजनेंत खीळ घातली एवढ्यावरच प्रकरण थांबलेलें नाहीं. मुंबई वेगळी करावी हा निर्णय ऐकल्यावर तिकडे नागपूर, वऱ्हाड येथून अधिकच कारवाया चालू झालेल्या आहेत. मराठवा-

ऱ्याच्या पांच जिल्ह्यांतले कापूस पिकाऊ तीन जिल्हे वऱ्हाडला जोडावे; ना॰ पूरचें महत्व संयुक्त महाराष्ट्रांत कमी होईल; ते शहर सध्या राजधानीचें शहर आहे, त्याला जिल्हा शहराचा दर्जा प्राप्त होईल. तेंव्हां तें महाकोशलांतच समाविष्ट करून घ्यावें; असले उपद्व्याप सुरू आहेत. अद्यापि वेळ गेलेली नाहीं तोंच आपण जागे होऊन या कारवायांना पायबंद घालावा हें बरें.

## सनदशीर सर्वपक्षीय चळवळ हवी

ही सगळी परिस्थिती लक्षांत घेतल्यावर प्रश्न असा विचारावासा वाटतो कीं संयुक्त महाराष्ट्र हवा असें म्हणणाऱ्या आपण करावें काय? आपण काय करावें तें ठरवण्यापूर्वी ॰॰ला एक सांगावसें वाटतें तें असें कीं जें कांहीं करावयाचें तें एका पक्षानें करतां कामा नये. शक्यतितकी समावेशक संघटना बनवून तें केलें पाहिजे. नाहीं तर तें एकाच पक्षाचें राजकारण बनेल. एकाच पक्षाचें व्यासपीठ बनेल आणि मग त्याला फारसें यश येणार नाहीं. म्हणून एक व्यापक व समावेशक व्यासपीठ बनावें आणि जें काहीं करावयाचें तें संयुक्त महाराष्ट्र परिषदेनेच पुढाकार घेऊ करावें असें मला वाटतें. संयुक्त महाराष्ट्र परिषदेने नागपूर ते कारवार पर्यंतच्या प्रातिनिधिक व्यक्तींना पुन्हां एकवार एकत्र बोलवावें आणि सर्वांच्या मतानें कार्यक्रम निश्चित करावा.

समावेशक मोर्चा उभारण्याच्या दृष्टीनें माझा जसा आग्रह आहे. तसाच माझा असाहि आग्रह आहे कीं संयुक्त महाराष्ट्राच्या सिद्धीसाठीं जी चळवळ करावयाची तिच्यामुळें हिंदी संघराज्याला कोणत्याहि प्रकारचा धोका निर्माण होणार नाहीं याची काळजी घेऊनच चळवळीचें स्वरूप निश्चित करण्यांत यावें. हिंदी संघराज्यांतील एक घटक राज्य म्हणून संयुक्त महाराष्ट्रास रहावयाचें आहे. स्वतंत्र राष्ट्र म्हणून नव्हे हें ज्यांना मान्य असेल त्यांचाच हा मोर्चा बनला पाहिजे.

कार्यक्रमाच्या प्रारंभीं बालघाट ते कारवारपर्यंतच्या टापूंत एक दोन आठवड्यांचा अत्यंत जोराचा प्रचारदौरा आपण आरंभावयास हवा. माझ्या

समजुतीप्रमाणें संयुक्त महाराष्ट्राच्या प्रभावें लोण आपण अद्यापि खेड्यापाड्यापर्यंत तर राहोच पण तालुक्याच्या शहरांपर्यंत सुद्धां पोंचविलें आहे असें म्हणतां येणार नाहीं. म्हणून गटवार विभागणी करून प्रचाराचा कार्यक्रम उरकून घेण्यांत यावा आणि सबंध महाराष्ट्रीय जनतेला या प्रभावें ज्ञान करून देण्यांत यावें.

## संयुक्त महाराष्ट्र दिन पाळा

एवढी प्राथमिक तयारी झाल्यानंतर संयुक्त महाराष्ट्र दिन पाळण्याचा आदेश परिषदेनें द्यावा. महाराष्ट्रांतल्या फक्त शहरांतून नव्हे तर खेडोंपाडी देखील हा दिन साजरा होईल अशी खटपट आपण करावी. संयुक्त महाराष्ट्र मान्य असणाऱ्या सर्व लोकांनीं त्यांत सामील व्हावें. विद्यार्थी, कामगार, शेतकरी, मध्यमवर्गीय लोक, स्त्रिया व पुरुष या सर्वांना त्यांत भाग घेतां येईल. त्या दिवशीं संयुक्त महाराष्ट्राच्या घोषणा देतां येतील, मिरवणूक व सभांचा कार्यक्रमहि करतां येईल. त्या दिवशीं कामगारांनीं एक दिवसाचा हरताळ पाळण्यासहि हरकत नाहीं.

## विधिमंडळांवर आमदारांनी बहिष्कार घालावा

हा कार्यक्रम जर अपेक्षेप्रमाणें यशस्वी झाला तर हिंदी मध्यवर्ती सरकारांतील व लोकसभेंतील श्री. आंबेडकर, गाडगीळ, देव, जेधे इत्यादि महाराष्ट्रीय नेत्यांना व मध्यप्रांतांतील व मुंबईतील महाराष्ट्रीय आमदारांना अशी विनंती करतां येईल कीं, संयुक्त महाराष्ट्राची अत्यंत न्याय्य अशी मागणी जोंपर्यंत सरकार मान्य करीत नाहीं तोंपर्यंत आम्ही सरकारच्या राज्यकारभारामध्यें सहकार्य देऊं शकणार नाहीं. सध्यां या मंडळींनीं राजीनामे द्यावे असें मी मुद्दामच सुचवीत नाहीं. कारण ते राजीनामे देण्यास तयार होतील असें मला वाटत नाहीं. परंतु लोकमताचें प्रदर्शन जर भव्य प्रमाणांत घडवून आणण्यांत आपण यशस्वी झालों आणि पुढच्या निवडणूकीच्या वेळीं या लोकमताला आपणास जाब द्यावा लागेल असें जर त्यांच्या मनाला पटलें तर ते राजीनाम्यासही तयार होण्याचा संभव नाहीं असें नाहीं. माझी अशी कल्पना आहे कीं या कार्य-

क्रमामुळें जबरदस्त अशा ऐक्यभावनेचें दर्शन हिंदी राज्यघटना संमत होण्या-पूर्वी जर आपण घडवूं शकलों तर सरकार या प्रश्नाबाबत अधिक ताणून धरणार नाहीं. पट्टाभि समितीच्या अहवालांत असें नमूदच करून ठेवलेलें आहे कीं भाषावार प्रांतरचनेच्या बाबतींत लोकमत जर आग्रही व प्रभावी असल्याचें दिसून आलें तर आम्हीं आपलें मत बदलूंही. पट्टाभीसमितीनें आपणाला दिलेला हा इशाराच आहे असें आपण समजूंया आणि त्यांनीं घातलेली शर्त पुरी करण्याचा आपण प्रयत्न करूं या. घटनासमितीमध्यें अथवा अ. भा. कॉं. क. मध्यें आपल्या बाजूला बहुमत करून घेण्याची श्री. देवांची व गाडगीळांचीं कल्पना मात्र मला भ्रामक वाटते. पंडित नेहरू, सरदार, व राष्ट्राध्यक्ष हे विरुद्ध आणि उत्तर हिंदुस्थानांतील प्रतिनिधींना हा प्रश्न किती निकडीचा आहे याची जाणीवच नाहीं. अशा परिस्थितींत संयुक्त महाराष्ट्र-वाल्यांचें बहुमत होणार कसें ? आम्हीं कॉंग्रेस सोडण्यामध्यें चूक झाली अशी टीका आमच्यावर श्री. देव अजूनहि करतात याचें नवल वाटतें. कॉंग्रेसमध्यें राहून घुसमटायला लागल्यानंतर एक बाहेर तरी पडलें पाहिजे किंवा शिस्तीच्या नांवाखालीं आत्मघात करून घेण्यास तरी तयार झालें पाहिजे. म्हणून श्री. देवांनीं आत्मवंचना व लोकवंचना करीत न बसतां कॉंग्रेसच्या बाहेर पडावें हेंच युक्त होय. संयुक्त महाराष्ट्राची इतकी जोरदार व बिनतोड तरफदारी करणारे डॉ. आंबेडकर या निर्णयानंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळीचें नेतृत्त्व करतील अशी माझी कल्पना होती पण तीहि दुर्दैवानें फोल ठरली आहे.

असो. मुंबई व्यतिरिक्त महाराष्ट्र आतां पदरांत पाडून घ्यावा व मुंबईची मागणी करीत रहावें असा पर्याय कांहीं लोक सुचवितात. पण हा मार्ग शहा-णपणाचा ठरणार नाहीं. मुंबईसकट संयुक्तमहाराष्ट्र अम्हाला हवा हा हट्ट आपण सोडतां कामा नये. अमुक एका तारखेपर्यंत मुंबईसकट संयुक्तमहाराष्ट्र देतो असें आश्वासन मिळालें तरी माझी हरकत नाहीं.

### महाराष्ट्राची अप्रतिष्ठा करूं नका

माझी सरकारला एवढीच विनंती आहे कीं, आम्हाला लोकसत्ताक मार्ग

सोडण्याची इच्छा होईल असें तुम्ही कांहीं करूं नका. कारण लोकसत्ताक पद्धति टिकविण्याची जबाबदारी विरोधी पक्षावर जितकी असते तितकीच किंबहुना जरा अधिकच ती सत्तारूढ पक्षावरहि असते. महाराष्ट्राच्या हातून कांहीं चुका झाल्या असतील, झाल्या आहेतहि पण आमच्या हातून जर राष्ट्रद्रोह घडला असें मानलें तर आमच्याहिपेक्षां किती तरी पटीनें जनताद्रोह व राष्ट्रद्रोह करणारे लोक देशांत विद्यमान् नाहींत काय? तपास करूं लागलों तर कदाचित ही सर्व मंडळी अेकाच प्रांतांतून आलेली आढळून येतील. मग त्या प्रांताचें शासन सरकार कोणत्या तऱ्हेनें करणार आहे?

महाराष्ट्राची चूक झाली असली तरी त्याला अवमानित करण्याचें धोरण सरकारनें अवलंबू नये. मागच्या युद्धानंतर जर्मनीला अवमानित करण्याचा प्रयत्न सरकारकडून झाला. त्या वेळच्या विचारवंतांनी दोस्त राष्ट्रांना अेक बजावून ठेवलें होतें कीं या धोरणाचे परिणाम अत्यंत अनिष्ट होतील. ही त्यांची वाणी अनुभवानें किती सत्य ठरली तें भयंकर क्रूर व संहारक अशा फाशीवादाच्या उदयामुळें आपल्या प्रत्ययास येऊन चुकलेंच आहे. म्हणून सरकारनें महाराष्ट्राला बुद्धिपुरस्सर दुखविण्याचें धोरण स्वीकारू नये. दुखावलेला महाराष्ट्र हिंदी संघराज्याच्या दृष्टीनेंहि अनिष्टच ठरेल. महाराष्ट्राला स्वतः विकास ज्यामुळें करून घेतां येईल आणि संघराज्यालाहि ज्यामुळें अधिक बळकटी प्राप्त होईल असेंच न्याय्य व दूरदर्शी धोरण सरकारनें आखावें.

## अध्यक्षीय समारोप

### संयुक्त महाराष्ट्र व सरकारी दृष्टिकोन

संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सकृत दर्शनी जितका लहान दिसतो तितका तो लहान नाहीं. भाषावार प्रांत रचनेचें तत्व कॉंग्रेसनें मान्य केलेलें असूनही आज कॉंग्रेसचे पुढारी तें तत्व डावलूं पहात आहेत. ह्याच्या मागे एक विशिष्ट भूमिका आहे. [illegible]श गेल्यानंतर कॉंग्रेसच्या हातीं हिंदुस्थानचीं

राज्यसूत्रें आलीं. कॉंग्रेसला आपली अधिसत्ता दृढ करावयाची आहे, आणि त्या दृष्टीनें ज्या ज्या प्रश्नावर कॉंग्रेस–विरोधी लोकमत तयार होत आहे ते ते प्रश्न डावलण्यांत येत आहेत. संयुक्त महाराष्ट्र हा देखील असाच एक प्रश्न आहे. जनताराज्य प्रस्थापित करण्याच्या दृष्टीनें भाषावार प्रांतरचना अत्यावश्यक आहे. परंतु जनता राज्याच्या आणि एक–वर्गीय समाजाच्या शोषणा कर–णारी कॉंग्रेसच आज भाषावार–प्रांत रचनेच्या विरुद्ध व्हावी यांतील रहस्य ओळखून घेतलें पाहिजे. आजचें सरकार हें एका विशिष्ट वर्गाला विशेष सवलती देत आहे. त्या लोकांचें समाधान करण्यासाठींच संयुक्त–महाराष्ट्राची मागणी धुडकावली जात आहे. संयुक्त–महाराष्ट्र निर्माण झाल्यावर ह्या प्रांतात कोणत्या मताचें प्राबल्य होईल हें वल्लभभाई व त्यांच्या मताचे लोक चांगले ओळखून आहेत. दार कामिशननें भाषावार प्रांतरचनेची मागणी करणाऱ्यांची Poona School of thought म्हणून संभावना केली आहे. त्या Poona School of thought विरुद्ध Vallabhbhai School of thought आहे. ह्या विचारसरणीच्या लोकांचाच राजसत्तेवर सध्या ताबा आहे. आपली मागणी मिळवण्यासाठीं या मध्यवर्ती पुढारीपणाशीच आपल्याला संघर्ष करावा लागणार आहे.

## व्यापक आधारी

या प्रश्नाचें स्वरूप इतकें गंभीर असल्यामुळें केवळ लोकमत प्रदर्शन करून प्रश्न सुटेल अशी मला आशा वाटत नाहीं. कारण हा प्रश्न म्हणजे वल्ल–भभाई आणि त्यांच्या धोरणावर विश्वास ठेवणाऱ्या लोकांचें राज्य या देशांत रहावयाचें कीं जनता राज्यावर विश्वास ठेवणाऱ्या आणि त्यासाटीं संघटना करणाऱ्या पक्षांचें राज्य व्हावयाचें असा हा सवाल आहे. म्हणून महाराष्ट्राला केवळ आपल्या बळावर मध्यवर्ती सरकारचें धोरण बदलतां येणें अशक्यप्राय आहे असें मला वाटतें. त्यासाठीं एका व्यापक भूमिकेवर लढा करावा लागेल. संयुक्त महाराष्ट्राचें महत्व महाराष्ट्रियांना जसें वाटतें तसें बिहारच्या जनतेला वाटणार नाहीं. परंतु त्या प्रांतांतही जनाता राज्याच्या दृष्टीनें महत्वाचे प्रश्न

उपेक्षिलेले आहेतच. ते प्रश्न व त्याचप्रमाणें इतर प्रांतातही आजच्या वल्लभाई राजवटीनें उपेक्षिलेले प्रश्न घेऊन सर्वांना एकसूत्रांत आणलें पाहिजे व अशी एक व्यापक आघाडी उभारली तरच हा प्रश्न सुटूं शकेल.

**लक्ष्याचें स्वरूप**

हा लढा कोणत्या स्वरूपाचा होईल हें आतांच सांगतां येणार नाहीं. तथापि कांहीं मर्यादा अवश्य सांगतां येतील. ब्रिटिशांच्यानंतर स्थापन झालेली शासनसंस्था आम्हास टिकविली पाहिजे. ती धोक्यांत येणार नाहीं अशी खबरदारी घेऊनच हा संघर्ष यशस्वी केला पाहिजे. जे लोक या भूमिकेवर एकत्र येऊं शकतील त्यांचीच एक आघाडी होऊ शकेल. महाराष्ट्रांत असे कांहीं लोक आहेत कीं, ज्यांना वल्लभभाईचें हें धोरण हितावह होईल. परंतु अशांची संख्या अगदीं मूठभर आहे. ते लोक आपल्याबरोबर येणार नाहींत. परंतु महाराष्ट्रांतील सर्वसाधारण जनतेला Vallabhbhai School of Thought पसंत नाहीं. त्यांची प्रकृती लक्षांत घेतां ते जनता राज्यासाठींच उभे राहातील ह्याबद्दल माझी खात्री आहे. अर्थात् सर्वसाधारण जनतेची संघटना प्रभावी व्हावयाची असेल तर आपण निरनिराळ्या जातीजमातीमध्यें परस्पर विश्वास निर्माण केला पाहिजे. सर्वसामान्य गुजराथी लोक हे देखील अज्ञानानें संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीविरुद्ध होण्याची शक्यता आहे. त्यांनाही आपली मागणी न्याय्य कशी आहे आणि त्यांत त्यांचाही फायदा कसा आहे हें समजून दिलें पाहिजे. आपला प्रचार केवळ महाराष्ट्रापुरतांच मर्यादित न ठेवतां इतर प्रांतांतही त्याचा प्रचार व्हावयास पाहिजे. तसें होईल तरच हा प्रश्न यशस्वी रितीनें आपणास सोडवितां येईल.